ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : .२ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

·वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ३० मार्च, १९५५ | अंक १३

## विविध माहिती

**भारतामधील पहिला टेलिव्हिजन सेट**—जबलपूर येथील सरकारी एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें भारतामधील पहिल्या टेलिव्हिजन सेटचें उद्घाटन करण्यांत आलें. पदवीनंतरचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण देण्यासाठीं त्याचा उपयोग करण्यांत येणार आहे. एका संगीताच्या वर्गाचें चित्रण पडद्यावर करण्यांत आलें. सुमारें ८०० विद्यार्थी हजर होते.

**नागपूर कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—नागपूर कॉर्पोरेशनच्या स्टँडिंग कमिटीच्या अध्यक्षांनीं १९५५–५६ सालचें अंदाजपत्रक सादर केलें आहे. अंदाजपत्रकांत उत्पन्नाच्या बाजूला १,३०,७६,३०२ रुपये दाखविण्यांत आले असून खर्चाच्या बाजूला १,६५,६३,९०४ रुपये दाखविण्यांत आले आहेत.

**अमेरिकेची भारताला मदत**—अमेरिकेच्या परराष्ट्र–मदत-खात्यानें विहिरी खणण्यासाठीं १,१४,१४० डॉलर्सची रक्कम मंजूर केली आहे. ह्या रकमेचा उपयोग करून भारताला जगांतील कोणत्याहि देशाकडून बोअरिंगची यंत्रसामुग्री विकत घेतां येईल. कुऱ्हाडी, फावडी, इत्यादि साहित्य घेण्यासाठीं नेपाळलाहि ४०,००० डॉलर्स मंजूर करण्यांत आले आहेत.

**नगर–रचना शिकविण्याची शाळा**—भारतीय सरकारनें दि इन्स्टिटयूट ऑफ टॉऊन प्लॅनर्स ह्या संस्थेच्या मदतीनें दिल्ली येथें नगर–रचना व प्रादेशिक नियोजन ह्याविषयींचें शिक्षण देणारी शाळा काढण्याचें ठरविलें आहे. छापखान्याच्या व्यवसायाचें शिक्षण देणाऱ्या ४ शाळाहि काढण्यांत येणार आहेत.

**आंध्र राज्यांतील रस्ते**— आंध्र सरकारनें राज्यांतील रस्त्यांची वाढ करण्यासाठीं १८ कोटी रुपये खर्च येणारी एक योजना तयार केली आहे. ह्या योजनेचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत यावा, असें सरकारचें म्हणणें आहे. ५०० च्या वर लोकवस्ती असलेल्या खेड्यांना जाणारे ५०० मैल लांबीचे नवे रस्ते बांधण्यांत येणार आहेत.

**झेक विमानाची देणगी**—मार्शल टिटो ह्यांनीं पं. नेहरूंना दोन एंजिनांचें एक झेक बनावटीचें विमान भेट म्हणून दिलें होतें. अशाच प्रकारच्या आणखी एका विमानाची मागणी भारतीय सरकारनें नोंदविली होती. हीं दोन्हीं विमानें आतां भारताच्या मार्गावर आहेत. विमानांतील कांहीं भाग स्वित्झरलंडमध्यें बसविण्यांत आले.

**सर्व गांवकऱ्यांना मालकीची जमीन**—सौराष्ट्रमधील सोरट जिल्ह्यांत समाज–विकास–योजनेचें कार्य चालू आहे. योजनेंतील एका खेड्यांत पूर्वी फक्त ८ जणांच्या मालकीच्या जमिनी होत्या व बाकीचे कुळे म्हणून जमीन करीत होते. आतां गांवांतील सर्व ६४ शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी आहेत.

**हिंदी भाषेंतील वाङ्मयाचा इतिहास**—नागरी–प्रचारिणी-सभेतर्फे हिंदी वाङ्मयाचा एक इतिहास प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. इतिहासाचे ७ खंड होणार असून ते सर्व प्रसिद्ध होण्यास ५ वर्षांचा अवधि लागेल. डॉ. अमरनाथ झा हे मुख्य संपादक आहेत. प्रत्येक खंड निराळ्या लेखकाकडून लिहवून घेण्यांत येईल. इतिहासासाठीं निरनिराळ्या राज्यांनीं १ लाख रुपये दिले आहेत.

**चांदी गाळण्याचा सरकारी कारखाना**—भारतीय सरकारचा चांदी गाळण्याचा कारखाना १९५६ अखेर काम करूं लागेल असा अंदाज आहे. कारखान्याला लागणारी यंत्रसामुग्री 'डिमॅग' ह्या जर्मन कंपनीकडून तीन हप्त्यांनीं घ्यावयाचा करार सरकारनें केला होता. त्यांपैकीं दोन हप्ते हातीं आले असून उरलेला लवकरच येईल.

**रांचीला पाण्याचा तुटवडा**—बिहार सरकारची उन्हाळी राजधानी रांची येथें पाण्याचा तुटवडा फारच जाणवत आहे. शहरांतील विहिरी उन्हाळ्याच्या तोंडालाच आटून जाऊं लागल्या आहेत. रांची म्युनिसिपालिटीनें सरकारकडे मदतीची मागणी केली आहे. शहराला नळाचें पाणी पुरवण्याच्या योजनेचें काम चालूं आहे. पण ती चालू वर्षीं पुरी होण्यासारखी नाहीं.

**ड्रेनेजच्या पाण्यापासून गॅस**—ड्रेनेजमधून वाहून जाणाऱ्या सांडपाण्याचा उपयोग करून गॅस तयार करण्याचे प्रयोग पश्चिम बंगाल सरकार करणार आहे. ह्या प्रयोगासाठीं सरकारनें ६०,००० रुपये मंजूर केले आहेत. प्रायोगिक कारखाना कलकत्त्याजवळच उभारण्यांत येणार आहे. ही योजना कलकत्ता कॉर्पोरेशनच्या संबंधित अधिकाऱ्यानें तयार केली आहे.

**अणुशक्तीनें तयार केलेली वीज**—अणुविषयक संशोधन-शाखेचे सभासद डॉ. भाभा ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, पुढील सहा वर्षांत भारतांत अणुशक्तीवर वीज निर्माण करणारा कारखाना उभारण्याचा सरकारचा विचार आहे. संकल्पित कारखान्याविषयीं अमेरिकेच्या ॲटामिक एनर्जी कमिशनशीं वाटाघाटी चालू आहेत. कारखान्यासाठीं सुमारें २० कोटी रुपये खर्च येईल व त्याच्या साह्यानें ६०,००० ते १,००,००० किलोवॅट वीज निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

**विजेचे दर कमी केले**—भोपाळमधील जे नागरिक घरगुती-कारणासाठीं विजेचा वापर करत असतील, त्यांना १ एप्रिलपासून दरमहा ३ रुपये इतकाच किमान आकार द्यावा लागेल. हल्लीं ५ रुपये किमान आकार द्यावा लागतो. भोपाळला विजेचा पुरवठा करणारी कंपनी सरकारच्या मालकीची आहे. दरांतील कपातीमुळें कंपनीच्या उत्पन्नांत वार्षिक ५०,००० रुपयांची खोट येईल.

### जगांतील सर्वांत मोठें धरण

सध्यां भारतांत बरींच लहान–मोठीं धरणें पाणीपुरवठ्यासाठीं अगर वीज उत्पन्न करण्यासाठीं किंवा दोन्हींसाठीं बांधण्यांत येत आहेत. तथापि, जगांतील सर्वांत मोठें धरण सेंट्रल आफ्रिकन फेडरेशनच्या सरकारनें झांबेसी नदीवर बांधण्याचें ठरविलें आहे. धरण बांधण्यापूर्वीं त्यासंबंधीं तांत्रिक दृष्ट्या पूर्ण विचार करण्यांत येणार आहे. हें कार्य एम. आंद्र कॉइन ह्या फ्रेंच धरणविषयक तज्ज्ञाकडे सोपविण्यांत आलें आहे. [मुंबईला तान्सा तलावांतून पिण्याच्या कांहीं पाण्याचा पुरवठा होतो. तान्सा धरण बळकट करण्यासाठीं १ कोटी रुपये खर्च येणारी दुरुस्तींची योजना ह्याच फ्रेंच तज्ज्ञानें सुचविली होती.] धरणाच्या कामासाठीं इंटर नॅशनल बँकेकडून कर्ज मिळेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. ह्या प्रचंड धरणाला सुमारें ११५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. धरणाची भिंत ३६० फूट उंचीची होईल व भिंत बांधून झाल्यावर जें कृत्रिम तळें तयार होईल त्याचा विस्तार १,४०० चौरस मैल इतका मोठा होईल. फेडरेशनमधील सॅलिसबरी ह्या शहरापासून २०० मैलांवर धरण बांधण्यांत येणार आहे. धरणामुळें ३०,००० लोकांच्या जमिनी जाणार आहेत. भारतामधील हिराकूद धरणांत जेवढें पाणी अडविलें जाईल त्याच्या १५ पट पाणी ह्या धरणांत अडविलें जाईल. ७,४०,००० किलोवॅट वीज निर्माण करणारें पॉवर–हौस धरणाच्या ठिकाणीं बांधण्यांत येणार आहे. पाऊस चांगला पडल्यास जास्तींत जास्त १०,५०,००० किलोवॅट विजेचें उत्पादन करण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. झांबेसी नदी ही उत्तर व दक्षिण ऱ्होडेशिआच्या सरहद्दीवर आहे. ह्या भागांत उद्योगधंदे निर्माण करण्यासाठीं व आफ्रिकन लोकांना काम देण्यासाठीं धरणाची योजना आंखण्यांत आली आहे.

---

### भारत व पश्चिम जर्मनी ह्यांच्यांतील व्यापार

भारत व प. जर्मनी ह्यांच्या दरम्यान नवा व्यापारी करार करण्यासंबंधीं लवकरच बोलणीं सुरू होणार आहेत. तथापि, नवा करार होण्यापूर्वीं कांहीं अडचणी उत्पन्न होणार असून त्यांना तोंड द्यावें लागणार आहे. भारत जर्मनीकडून जितक्या किंमतीची मालाची आयात करतो, त्यामानानें निर्यात करण्याच्या बाबतींत मात्र यश येत नाहीं. त्यामुळें भारताचे जर्मनीकडे व्यापारी देणें झुकत आहे. जर्मनीकडून भारत यंत्रसामुग्री आयात करतो. आयात केलेल्या यंत्रसामुग्रीची किंमत गेल्या वर्षीं ११·५ कोटी मार्कस् इतकी झाली. विजेचें साहित्य आणि रासायनिक साहित्य ह्यांच्या आयातींतहि अशीच वाढ झालेली आहे. जर्मनीकडून भारताला मिळूं शकणाऱ्या भांडवली मालाची अशीच वाढ होत राहील असा अंदाज करण्यांत आला आहे. जर्मनीकडून भारतांत जी आयात करण्यांत येते, तींपैकी तीन-चतुर्थांश माल भांडवली स्वरूपाचा असतो. पुढील वर्षीं भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला प्रारंभ करण्यांत येईल. अर्थातच, भांडवली स्वरूपाच्या मालाची मागणी आणखी वाढेल आणि त्यामुळें भारताच्या व्यापारी देण्यांत अधिकच वाढ होईल. जर्मनी भारताकडून घेत असलेल्या मालाचें प्रमाण कमी होत असल्यामुळें वरील परिस्थिति उद्भवली आहे. १९५३ च्या मानानें १९५४ सालीं भारताकडून जर्मनीला होणारी निर्यात ८ टक्क्यांनीं कमी झाली. नुसत्या मँगेनीझचीच निर्यात कमी झाल्यामुळें भारताला १·४ कोटी मार्कसना मुकावें लागलें. १९५४ सालीं जर्मनीनें भारताकडून अवघें ८०,००० टन मँगेनीझ घेतलें. १९५३ सालीं ह्यापेक्षां जवळ जवळ दुप्पट मँगेनीझ जर्मनीनें आयात केलें होतें. भारतामधून जर्मनीला निर्यात करण्यांत येणाऱ्या अशुद्ध लोखंडाच्या बाबतींतहि अशीच परिस्थिति आहे.

---

### भारताची प्रगति : ब्रिटिश बँकरचें मत

लंडनमधील मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया लि. चे चेअरमन, सर केनेथ मीलिंग, हे भारत, पाकिस्तान व सिलोन ह्या देशांचा दौरा करून नुकतेंच ग्रेटब्रिटनकडे परत गेले. बँकेच्या वार्षिक अहवालास जोडलेल्या आपल्या रिपोर्टांत, त्यांनीं ह्या देशांच्या प्रगतीबाबत त्यांचा अभिप्राय नमूद केला आहे. ते म्हणतात, कीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सर्व वर्षांत १९५४ हें वर्ष भारताला सर्वच दृष्टींनीं सर्वांत चांगलें गेलें. भारताची आर्थिक परिस्थिति खूपच सुधारली, मजुरांच्या रहाणीच्या खर्चाचा इंडेक्स नंबर उतरणीच्या मार्गावर आहे आणि व्यापार–उद्योगास चलती लाभली. १९५१ मध्यें सुरू केलेली पंचवार्षिक योजना १९५६ मध्यें पुरी होईल. एकूण २२४९ कोटी रुपये खर्चाच्या उद्दिष्टापैकीं फक्त ४०% रकम मार्च १९५४ अखेर खर्ची पडली. पंचवार्षिक योजनेचीं सर्व लक्ष्यें गांठतां आलीं नाहींत, तरी बरीच प्रगति होईल आणि दुसरी पंचवार्षिक योजना सुरू होण्याच्या मार्गावर आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या गतीस (प्रत्येक १२ वर्षांत सुमारें ४॥ कोटी) तोंड देण्यासाठीं शेतकीचें उत्पादन व औद्योगिक उत्पादनक्षमता वाढविण्याचें अगत्य भारताला पटलेलें आहे. त्यादृष्टीनें, भारतानें पाणीपुरवठ्याच्या, हैड्रो-इलेक्ट्रिसिटीच्या, औद्योगिक उत्पादनाच्या व खतांच्या कारखान्यांच्या मोठ्या योजना आंखल्या आहेत. एका स्वतंत्र मध्यवर्ती बँकेमार्फत शेतीला कर्जपुरवठ्याची व्यवस्था करण्याचें घाटत आहे. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्याचे कामीं शेतकऱ्यांनीं खतांचा अधिकाधिक उपयोग करणें व कुटुंबनियोजनाचा प्रसार करणें, हे महत्त्वाचे उपाय आहेत. ग्रेटब्रिटनबद्दल भारतांत अजून कितीतरी आपुलकी आहे; मालाची किंमत आणि रवानगी ह्या बाबतींत ब्रिटिश कारखानदार स्पर्धा करूं शकले, तर त्यांनाच ऑर्डरी देण्याची भारतीयांची इच्छा असल्याचें आढळतें.

---

**डोळ्यांच्या उपचाराचें केंद्र**—नेत्र-रोगांवर उपचार करणारें एक केंद्र अहमदाबाद येथें स्थापन करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. केंद्रासाठीं ५,८८४ रुपयांची रकमहि मंजूर करण्यांत आली आहे. वरील रकमेचा विनियोग उपचार-विषयक सामुग्री विकत घेण्यासाठीं होईल. मुंबई राज्याच्या उत्तर भागांतील ग्रामीण विभागांत राहणाऱ्या नेत्र-रोग्यांना केंद्रातर्फे उपचार करण्यांत येतील.

**अमेरिकन तुपाच्या आयातीला विरोध**—राजकोट शहर काँग्रेस कमिटीतर्फे भरविण्यांत आलेल्या जाहीर सभेंत, भारतांत अमेरिकन तूप आयात करण्यास जोराचा विरोध करण्यांत आला. ही आयात करण्यामुळें देशांतील शेती व पशुसंवर्धन ह्यांना गंभीर स्वरूपाचा अपाय होईल, अशा आशयाचा ठराव सभेंत मंजूर करण्यांत आला. सौराष्ट्रांतील तुपाच्या धंद्यावरहि अनिष्ट परिणाम होईल, असें मत व्यक्त करण्यांत आलें.

# अर्थ

बुधवार, ता. ३० मार्च, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुंबई गिरणी–कामगारांचें वेतन

लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनलच्या ताज्या निवाड्याप्रमाणें, मुंबई-मधील गिरणी–कामगारांना जादा वेतन मिळालें आहे; त्यांची मासिकप्राप्ति सरासरी ७ रुपयांनीं वाढली आहे. आज, मुंबई-मधील कोणत्याहि गिरणी–कामगाराची मजुरी व महागाईभत्ता मिळून दरमहा १०४ रुपयांपेक्षा कमी प्राप्ति नाहीं, आणि सरासरी प्राप्तीची रक्कम १२१ रुपये आहे. सुमारें ५ हजार गिरणी-कामगारांना २१० रुपयांपेक्षा अधिक प्राप्ति होते. ट्रायब्यूनलच्या निवाड्यामुळें कामगारांच्या हातांत तात्काळ ३½ कोटी रुपये पडले आहेत, आणि दरसाल त्यांना १½ कोटी रुपये अधिक मिळत रहातील.

मुंबई राज्यांतील कपास–कापडाच्या गिरण्यांची चौकशी करण्यासाठी १९३७ मध्यें काँग्रेस सरकारनें 'दिवाटिया कमिटी' नेमली होती. कमिटीच्या इंटेरिम रिपोर्टानें कामगारांच्या वेतनांत १२½% वाढ सुचविली, तिला गिरणीमालकांनीं संमति दिली. अशा रीतीनें कामगारांची सरासरी प्राप्ति ३२½ रु. झाली. दिवाटिया कमिटीनें आपल्या पक्क्या रिपोर्टांत वेतनाची श्रेणी ठरविली त्यांत किमान वेतन २५ रु. ठरविलें. मुंबईत ५० ते ५५ रु. प्राप्ति तरी असावी, असा कमिटीचा अभिप्राय होता.

युद्ध सुरू झाल्यामुळें कमिटीची योजना अंमलांत आणण्याचें स्थगित करण्यांत आलें. युद्धसमाप्तीनंतर कामगारांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी सर हरसिद्धभाई दिवाटिया (१९३७ मधील कमिटीचे अध्यक्ष) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं इंडस्ट्रिअल कोर्टाचें बेंच नेमण्यांत आलें. ह्या इंडस्ट्रिअल कोर्टानें किमान वेतन ३० रु. ठरविलें व त्या पायावरील वेतनश्रेणी लक्षांत घेतां, सरासरी वेतन ४१ रु. वर गेलें. १९४७ पासून एकसारखें, अवार्डला अनुषंगिक अशा किरकोळ बाबींचे निर्णय होत जाऊन, सरासरी किमान वेतन १९५४ मध्यें ४७ रु. ८ आणे पर्यंत पोंचलें.

ह्या किमान वेतनांत महागाईभत्त्याची भर पडत असते. युद्धास प्रारंभ झाल्यापासून, सर साजबा रांगणेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालील कन्सिलिएशन बोर्डाच्या शिफारशींना अनुसरून गिरण्या महागाईभत्ता देत आल्या आहेत. मुंबईतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाच्या इंडेक्स नंबरांतील चढउतारावर हा भत्ता अवलंबून ठेवण्यांत आला होता. इंडस्ट्रिअल कोर्टानें १९४७ मध्यें महागाईभत्ता, युद्धापूर्वीच्या १०५ ह्या इंडेक्स नंबरावरील प्रत्येक एका पॉईंटला दररोज १·७५ पै ऐवजीं १·९ पै असा वाढवून दिला. महागाईभत्त्याचा हिशेब असा स्वतंत्रपणें करण्यांत आला, तरी प्रॉव्हिडंट फंड, स्टेट–इन्शुअरन्समध्यें कामगारानें भरावयाची रक्कम, कपातीनिमित्त करावयाची भरपाई, रजेचा पगार, इत्यादींसाठी तो विचारांत घेतला जात होता.

लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनलच्या ताज्या निवाड्यानें महागाई-भत्त्यांत १०% वाढ झाली आहे व मे, १९५३ पासूनचा हिशेब करून तो द्यावयाचा आहे. आजच्या इंडेक्स नंबराप्रमाणें, दरमहाचा महागाईभत्ता ७४ रु. होतो. म्हणजे, मुंबईतील गिरणी-कामगारांचें सरासरी वेतन ४७ रु. ८ आ. + ७४ रु. = १२१ रु. ८ आ. इतकें होतें.

कामगाराला नफ्यांत हिस्साहि मिळत असतो. प्रथम प्रथम गिरण्या स्वतः होऊन बोनस जाहीर करीत असत, पण आतां तो गिरण्या व कामगार ह्यांच्यांतील वादाचा एक विषय झालेला आहे. ह्या बोनसची रक्कम वर्षातून एकदांच मिळते, ती सरासरी १२० रु. भरते. म्हणजे कामगाराच्या प्राप्तींत दरमहा सरासरीनें १० रु. ची भर पडते. त्याचा अर्थ, कामगाराची सरासरी प्राप्ति १२१ रु. ८ आ. + १० = १३१ रु. ८ आ. अशी होते.

मजुरी, महागाईभत्ता, बोनस, ह्याबरोबरच आणखीहि रक्कम कामगारांसाठी खर्ची पडते; तिचें स्वरूप अप्रत्यक्ष असतें एवढेंच. कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें जे नवे कायदे झालेले आहेत, त्यांमुळें गिरण्यांवर प्रत्येक कामगारानिमित्त दरमहा सुमारें १५ रु. चा बोजा पडतो, असा हिशेब करण्यांत आलेला आहे. म्हणजे, कामगारांची मासिक प्राप्ति १३१ रु. ८ आ. + १५ रु. = १४६ रु. ८ आ. इतक्यापर्यंत जाते.

मुंबईमधील गिरणी कामगारांच्या भत्त्यांत १०% वाढ लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनलनें केली व ही वाढ मे, १९५३ पासूनचा हिशेब करून द्यावयाची आहे. १८ मार्च, १९५५ पूर्वी कामगारांना हिशेब चुकता करावयाचा होता, त्याप्रमाणें चार गिरण्या सोडून बाकीच्या सगळ्यांनीं रकमा देऊन टाकल्या. चार गिरण्यांनीं मात्र हें देणें देण्यासाठी हप्ते मागणारा अर्ज ट्रायब्यूनलकडे दाखल केला. ह्या मागणीस तीव्र विरोध दर्शविण्यासाठी, तीन गिरण्यांतील ८,००० कामगारांनीं कामावर न जातां, मिरवणूक काढून ट्रायब्यूनलच्या कचेरीपुढें निदर्शनें केलीं. मिरवणुकीच्या आघाडीवर १,००० स्त्रिया होत्या. ट्रायब्यूनलनें दि. १८ रोजीं निवाडा दिला, कीं गिरण्यांनीं एकूण देण्यापैकी निम्मी रक्कम ताबडतोब दिली पाहिजे व बाकीची निम्मी एका आठवड्यांत चुकती केली पाहिजे.

अशा परिस्थितींत, कामगारांकडून उत्पादनास मिळावयाचें साहाय्य वाढत गेलें असतें, तर गोष्ट वेगळी होती. पण, तसें होऊं शकत नाहीं आणि उत्पादन–खर्चांतील ही बाब गिरणीमालकांना गैरसोईची वाटते. कामगारांच्या उत्पादनास हातभार वाढविण्यासाठी नवीं यंत्रें बसविण्याचा प्रयत्न झाला, तर त्यासहि कामगारांचा विरोध होतो; कारण कामाच्या यांत्रिकीकरणाचा परिणाम कामगारांची संख्या कमी होण्यांत झाल्याविना रहाणार नाहीं. मध्यमवर्गीयांचा तर कामगारांचा हेवा वाटण्याजोगी परिस्थिति आहे. अर्थात्, तो कामगारांचा दोष नसून, ज्यांची औद्योगिक संघटना होणें अशक्य आहे व ज्यांच्यावर उत्पादन प्रत्यक्ष अवलंबून नाहीं, अशा लोकांच्या विशिष्ट अडचणींच्या परिस्थितीचा परिणाम आहे.

## राष्ट्रीय कार्यासाठी श्रमिकांची फौज

दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे संचालक, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं राष्ट्रांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीं श्रमिकांची एक संघटना काढावी असें सुचविलें आहे. ह्या संघटनेचें नांव नॅशनल लेबर फोर्स असें असावें व त्यांत सुरवातीला १० लाख लोकांची नोंद करण्यांत यावी, असें त्यांचें म्हणणें आहे. भारतीय विधिमंडळाच्या काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीसमोर त्यांनीं आपल्या योजनेचा तपशील नुकतांच निवेदन केला. ते म्हणाले कीं अशा प्रकारच्या योजनेमुळें उत्पादक रोजगार तर निर्माण होईलच; पण त्याशिवाय राष्ट्रीय ऐक्य आणि शिस्त ह्यांचीहि जोपासना होईल. संकल्पित श्रमिकांच्या फौजेंत मुख्यतः खेड्यांतील गरीब लोकांची भरती करण्यांत यावी. ह्या फौजेला रस्ते बांधणें, पूल बांधणें, छोटी पाटबंधाऱ्यांचीं कामें करणें, इमारती बांधणें, इत्यादि कामावर लावण्यांत यावें. संघटनेंतील शिस्त लष्करासारखी नाहीं तरी बरीच कडक असावी. अशा प्रकारची संघटना स्थापन केल्यास देशांत हवी तेथें वापरतां येईल अशी एक जोरदार श्रमिकांची फौजच तयार होईल. ह्या फौजेला मदत म्हणून ज्या लोकांना वर्षांतून कांहीं काळच काम असतें, अशा लोकांच्या स्वयंसेवक-संघटना उभारण्यांत याव्या. उदाहरणार्थ, विद्यार्थी अगर हंगामी काम असलेले लोक ह्यांच्या ऐच्छिक संघटना उभारतां येतील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत श्रमिकांच्या फौजेंतील लोकांची संख्या २० लाखापर्यंत वाढविण्यांत यावी. त्याशिवाय देशांतील ग्रामीण विभागांत लहान लहान औद्योगिक शहरें वसविण्यांत यावींत. मात्र निर्वासितांची पुनर्वसाहत करतांना जशी स्थिति झाली तशी होऊं न देण्याची खबरदारी घ्यावी. अशा औद्योगिक शहरांतून प्रत्यक्ष रोजगार मिळतो कीं नाहीं, त्यावर लक्ष ठेवलें गेलें पाहिजे.


**ब्रिटनचा नागरी संरक्षणाचा खर्च**—येत्या आर्थिक वर्षांत ब्रिटिश सरकार नागरी-संरक्षणावरील खर्चांत सुमारें ६० लाख पौंडांची कपात करणार आहे. इंग्लंड आणि वेल्ससाठी चालू वर्षी १,६५,०८,५५५ पौंडांची तरतूद करण्यांत आली होती. पुढील वर्षी १,०९,१८,६२० पौंड खर्च करण्यांत येणार आहेत. स्कॉटलंडवरील खर्चांतहि कपात करण्यांत आली आहे.

## सोव्हिएट यंत्रसाहित्याचें कायमचें प्रदर्शन

मुंबई राज्याचे गव्हर्नर डॉ. हरेकृष्ण मेहताब ह्यांनीं मुंबई येथें सोव्हिएट-रशिआंत तयार होणाऱ्या यंत्रसाहित्याच्या कायम प्रदर्शनाचें उद्घाटन गेल्या आठवड्यांत केलें. प्रदर्शनांत रशियांत तयार होणाऱ्या यंत्रसाहित्याचा अगदीं अल्प असा भाग ठेवण्यांत आला आहे. भारी यंत्रसामुग्री जागेच्या अडचणींमुळें ठेवण्यांत आलेली नाहीं. प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना गव्हर्नरसाहेब म्हणाले कीं ३०–४० वर्षांपूर्वी रशिया यंत्रविज्ञानांत फार मागासलेला होता. परंतु संशोधन आणि कष्ट ह्यांच्या साह्यानें तो आतां इतर देशांना सल्लामसलत आणि यंत्रसामुग्री देण्याइतका प्रगत झाला आहे. भारतहि आतां झपाट्यानें प्रगति करीत आहे. परंतु इतक्या मोठ्या देशाची भरभराट घडवून आणणें हें फार मोठें काम आहे. म्हणूनच, कोणत्याहि देशाच्या राजकीय मतांचा विचार न करतां त्या देशाकडून मिळण्यासारखी मदत घेण्यास भारतानें अनमान करूं नये. भारतामधील उद्योगपतींना आपल्या गरजांची चांगली कल्पना आहे. ह्या प्रदर्शनाच्या निमित्तानें भारताला स्वतःला लागणारें इंजिनिअरिंगचें साहित्य स्वतःच तयार करण्यास चांगली स्फूर्ति मिळेल. रशिआचे दुय्यम व्यापारी प्रतिनिधी मि. कुलिकोव्ह ह्याप्रसंगीं म्हणाले कीं, भारत व रशिआ ह्यांच्यामधील आर्थिक सहकार्य अद्याप प्राथमिक अवस्थेंत आहे. तथापि, १९५२ च्या मानानें १९५४ सालीं भारत व रशिआ ह्यांच्यांतील मालाची देवाण-घेवाण चौपट झालेली दिसून येते. पुढील कांहीं वर्षांत उभयतः देशांतील व्यापार पुष्कळच वाढेल ह्यांत शंका नाहीं. आजच्या प्रदर्शनावरून एक गोष्ट दिसून येईल, ती ही कीं दुसऱ्या देशांना जरूर असणाऱ्या मालाचें उत्पादन रशिआ करूं शकेल.


## रिझर्व्ह बँक गव्हर्नरांची मुदतवाढ

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. बी. रामराव, ह्यांच्या गव्हर्नर पदाची मुदत भारत सरकारनें आणखी दोन वर्षांनीं वाढविली आहे. २२ नोव्हेंबर रोजीं सरकारनें जाहीर केलें होतें, कीं श्री. रामरावांची जागा श्री. एन. आर. पिले हे ३० जून, १९५५ रोजीं घेतील. श्री. पिले हे गव्हर्नरपदासाठी उपलब्ध करून देता येणार नाहींत, असें आतां दिसून आलें आहे म्हणून श्री. रामराव ह्यांची मुदतवाढ करण्याचें ठरलें आहे.

किर्लोस्कर

हात पंप | सेंट्रिफ्युगल पंप



उन्हाळी पिकासाठीं व
घरगुती पाणीपुरवठ्यासाठीं
खात्रीची उपाययोजना

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ] दुसरी आवृत्ति [ किं. २॥ रु.

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, वि. द. घाटे, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र, किर्लोस्कर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें, कडून पुरस्कार.

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.

## एस्टेट ड्यूटीबाबत मुंबई हायकोर्टातील पहिला निवाडा

१९२८ मध्यें जमनादास वसनजी ह्यानें ५ लक्ष रुपयांचा ट्रस्ट केला. त्यांत अशी तरतूद केली, कीं ट्रस्ट करणाराच्या मृत्यूनंतर ट्रस्टींनीं त्याच्या चारहि मुलींसाठीं प्रत्येकीं ५०,००० रुपये काढून ठेवावे. ह्या रकमेंतून ट्रस्टींनीं प्रत्येक मुलीच्या विवाहावर ज्यास्तींत ज्यास्त २५,००० रुपये खर्च करावे व उरलेली रक्कम प्रत्येक मुलीला ती १८ वर्षांची झाल्यावर देऊन टाकावी. उरलेली रक्कम ट्रस्ट करणाराच्या दोन्ही मुलांत सारखी वाटून द्यावी.

१९५४ मध्यें जमनादास मरण पावला. ट्रस्ट-फंडाव्यतिरिक्त आणखी कित्येक लाखांची मालमत्ता त्यानें मागें ठेवली होती. एस्टेट ड्यूटी ट्रस्टच्या एकूण रकमेवर आकारावयाची असते, तेव्हां ट्रस्टखालीं ज्यांना पैसे मिळावयाचे अशा चारहि मुलींनीं त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणांत एस्टेट ड्यूटीचा भार सोसावा किंवा नाहीं, असा कायद्याचा प्रश्न उपस्थित झाला. ट्रस्ट करणारानें ट्रस्ट-खालील मालमत्तेव्यतिरिक्त आणखीहि मालमत्ता मागें ठेवली होती, तेव्हां तिच्या सबंद किंमतीवर ज्या भारी दरानें आकारणी होईल, तोच दर चारहि मुलींच्या हिश्श्याला लागू होईल काय, हाहि प्रश्न पुढें आला.

दोन मुलींचे विवाह जमनादासच्या हयातींतच झाले, त्यांचा खर्च जमनादासनेंच केला. तरीपण, त्या दोघींनीं प्रत्येकीं ५०,००० रुपयांच्या हिश्श्याची मागणी केली. ट्रस्टची रक्कम वगळून, उरलेली जी रक्कम दोघा मुलांच्या वाट्यास आली, त्यांतून चौघींच्याहि हिश्श्याची एस्टेट ड्यूटी दिली जावी, अशी चारहि जणींनीं मागणी केली.

एस्टेट ड्यूटी सर्वांनीं, हिश्श्याच्या प्रमाणांत भरावी, असें सहाहि जणांनीं दावा चालू झाल्यावर मान्य केलें. ड्यूटीचा दर जमनादासची सर्व मालमत्ता हिशेबांत घेऊन जो ठरेल, तोच सर्वांना लागूं होईल, असें हायकोर्टानें ठरविलें.

दोघी विवाहित मुलींनीं प्रत्येकीं ५०,००० रुपयांची मागणी केली होती, तिला मुलांनीं विरोध केला नाहीं.

---

## मुंबई राज्य सहकारी परिषद

### सोलापूर येथील २२ वें अधिवेशन
### २ ते ४ एप्रिल, १९५५

उद्घाटक : श्री. बा. गं. खेर

मुख्य अध्यक्ष : श्री. के. डी. मालवीय,
('नॅचरल रिसोर्सेस' मंत्री)

स्त्री-विभागाच्या अध्यक्ष : श्रीमती निर्मलाराजे भोसले

विषय : (१) रूरल क्रेडिट सर्व्हे अहवालाच्या अनुषंगानें ग्रामीण पद्धतीची पुनर्घटना.

(२) कर्जपुरवठा व विक्री ह्यांची सांगड व संघ-संस्थांची वाढ ह्या दृष्टीनें शेतीच्या मालाची विक्री-व्यवस्था.

(३) कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रॉजेक्टस् व नॅशनल एक्सटेन्शन सर्व्हिस ह्यांच्या वाढीच्या दृष्टीनें, देखरेखीची व्यवस्था.

(४) प्राथमिक सोसायट्या व सामान्य जनता ह्यांचेसाठीं सहकारी शिक्षण व्यवस्था.

(५) औद्योगिक सहकार व त्याचें राष्ट्रीय आर्थिक संसारांतील स्थान, याची चर्चा.

(६) मुंबई राज्यांतील सहकारी घर-बांधणीच्या प्रगतीचा आढावा व त्याच्या विकासाविषयीं सूचना.

## केरळमध्यें टायर्स तयार करण्याचा कारखाना

त्रिवेंद्रम येथें टायर्स तयार करण्याचा कारखाना काढण्याची योजना त्रावणकोर-कोचीनच्या राज्य सरकारनें आंखली आहे. ह्या नव्या कारखान्यासाठीं अमेरिकेंतील इंटरनॅशनल गुडरिच कंपनीचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. कंपनीचें प्राथमिक भांडवल २ कोटी रुपयांचें असेल व त्यांतील २० ते २५ टक्के भाग-भांडवल राज्य-सरकार खरेदी करणार आहे. उरलेल्या भांडवलापैकीं कांहीं अमेरिकन कंपनी उभारणार आहे व कांहीं भारतामधील नागरिकांना विकण्याकरितां खुलें ठेवण्यांत यावयाचें आहे. भारतामध्यें रबराचें उत्पादन फक्त त्रावणकोर-कोचीन-मध्येंच होतें. दरवर्षी सामान्यपणें २२,००० टन रबराचें उत्पादन करण्यांत येतें. राज्यांत रबराचें उत्पादन करणारे मोठे व छोटे उत्पादक सुमारें १४,००० आहेत. राज्यांतील रबराच्या उत्पादकांची रबर प्रोड्यूसर्स असोसिएशन ह्या नांवाची एक संस्था आहे. संकल्पित कारखान्याच्या डायरेक्टर बोर्डावर ह्या संस्थेचा एक प्रतिनिधि घेण्याचें ठरलें आहे. गुडरिच कंपनी नव्या कारखान्यांत आपल्याजवळचें अगदीं आधुनिक तंत्रज्ञान वापरणार असून ट्यूबची जरूर नसणारे आणि छिद्रें पडल्यास तीं आपो-आप भरून काढणारे टायर्स तयार करण्यांत येणार आहेत. गुडरिच कंपनीचे उपाध्यक्ष, मि. हेलमन, ह्यांनीं त्रावणकोर-कोचीनच्या मुख्य मंत्र्यांची भेट घेऊन कारखाना काढण्याविषयीं विचारविनिमय केला. सध्या भारतांत टायर्स करणारे फक्त दोन कारखाने आहेत. त्यापैकीं एक कलकत्ता येथें असून तो गुडरिच कंपनीच्याच मालकीचा आहे. दुसरा कारखाना फायर-स्टोन कंपनीचा असून तो मुंबईस आहे; ह्या दोन्हीं कारखान्यांना लागणारा रबराचा पुरवठा त्रावणकोर-कोचीन राज्यांतूनच होत असतो. नियोजित कारखाना हा भारतामधील तिसरा होईल.

---

## भारतांत मोटारींचीं एंजिनें तयार होणार

भारतामधील स्टँडर्ड मोटार प्रॉडक्टस् ऑफ इंडिया लि. ह्या कंपनीनें इंग्लंडमधील स्टँडर्ड मोटार कंपनीच्या साह्यानें मद्रास-जवळ मोटारी तयार करण्याचा कारखाना काढला आहे. ह्या कारखान्यांत छोट्या मोटारींना लागणारीं एंजिनें येत्या जूनपासून तयार होऊं लागतील, असें समजतें. दररोज ४ एंजिनें तयार होतील, असा अंदाज करण्यांत आला आहे. ब्रिटिश स्टँडर्ड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. डिक भारतांत आले होते. त्यांनीं असें सांगितलें कीं, मद्रासच्या कारखान्यासाठीं लागणारीं यांत्रिक हत्यारें ब्रिटनहून मागविण्यांत आलीं असून तीं लवकरच हातीं येतील. मोटारी तयार करण्याच्या निरनिराळ्या अवस्थांची माहिती सांगतांना ते म्हणाले कीं "भारतामधील कारखान्यांत तयार होणाऱ्या मोटारींसाठीं व ट्रॅक्टर्ससाठीं शक्य तितका अधिक देशी कच्चा माल वापरण्याचा आमचा विचार आहे. सध्या मद्रासमधील कारखान्यांत ३० टक्के कच्चा माल देशीच वापरण्यांत येतो. नवीन यंत्रसामुग्री वापरण्यास प्रारंभ झाल्यावर कारखान्यांत दरवर्षी सुमारें १,००० मोटारी तयार होतील. भारतामधील मोटारींचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचें भवि-तव्य उज्ज्वल आहे, असें मला वाटतें. तथापि, ह्या धंद्याला यश येण्यास एका गोष्टीची फार गरज आहे. मोटारींना निरनिराळ्या प्रकारचे अनेक भाग लागतात. संपूर्ण मोटार बनविण्यासाठीं हे भाग त्वरेनें मिळणें जरूर असतें. म्हणून हे भाग बनविणारे उद्योगधंदे जितक्या लवकर निघतील, तेवढें श्रेयस्कर.

## दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस १९५४ मध्यें मागील सालचा शिल्लक नफा १,०८८ रु. जमेस धरून एकूण ३१,२१२ रु. नफा झाला. त्याची वाटणी डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें सुचविली आहे:—

| | रु. |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | ११,००० |
| इन्व्हेस्टमेंट रि. फंड | ३,००० |
| डिव्हिडंड | १४,३०० |
| नोकर-वर्गास बोनस | २,००० |
| पुढील सालाकरितां वर्ग | ९१२ |
| | रु. ३१,२१२ |

ऑर्डिनरी शेअर्सवर ६% करमाफ व प्रेफरन्स शेअर्सवर करासह ५ व ६% डिव्हिडंड दिलें जाईल.

बँकेच्या आद्य संस्थापकांपैकी व तिचें संचालक मंडळावर बरींच वर्षे काम केलेले श्री. ल. मो. उर्फ अण्णासाहेब आपटे व श्री. रा. ग. ऊर्फ भाऊसाहेब सोमण हे दिवंगत झाले. त्यांच्या अनुभविक सल्ल्याची व कुशल मार्गदर्शनाची व्यवस्थापक मंडळास चांगलीच मदत होत असे.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,४०,८८० | रोख बँकांत | ५,१२,१८६ |
| रिझर्व्ह, इतर फंड | १,८६,००० | इन्व्हेस्टमेंट | १७,५३,६६० |
| ठेवी | ३९,९४,००० | कर्जे | २४,१६,८४७ |

## इलेक्ट्रिक मोटारींच्या उत्पादनांत वाढ

भारत स्वतंत्र झाल्यापासून, हिंदी विजेच्या मोटारींचें उत्पादन पांचपट वाढलें आहे. १९४७ मध्यें त्यांचें उत्पादन ३७,००० अश्वशक्ति एवढें झालें; १९५४ मध्यें तें १,८७,००० अश्वशक्ति इतकें वाढलें. सध्यां भारतांत इलेक्ट्रिक मोटारी बनविणारे १२ कारखाने आहेत व त्यांची वार्षिक उत्पादनक्षमता ३,४०,००० अश्वशक्ति एवढी आहे. अद्याप २२५ अश्वशक्तीपेक्षा मोठ्या मोटारी तयार होत नाहींत, पण त्या करण्याची कारखान्यांची सज्जता आहे. बारा कारखान्यांपैकी सहा कारखाने ५० अश्वशक्तीपेक्षा मोठ्या मोटारी बनवूं शकतात. कांहीं कारखान्यांचा विस्तार करून व नवे कारखाने काढून, एकूण उत्पादनक्षमता १,०५,००० अश्वशक्तीनें वाढण्याजोगी आहे. ३०० अश्वशक्तीपर्यंतच्या मोटारी तयार करतां याव्यात, अशी योजना आहे. गेलीं दोन वर्षे, ५० अश्वशक्तीपर्यंतच्या ए. सी. ३–फेजच्या इलेक्ट्रिक मोटारींची आयात पूर्णपणें बंद आहे, आणि ७५ अश्वशक्तीपर्यंतच्या इलेक्ट्रिक मोटारींच्या आयातीवर नुकतीच बंधनें घालण्यांत आलीं आहेत.

**८,००० रुपयांत १८ देशांची सफर**—गुजरात विद्यापीठांतील विद्यार्थी श्री. कन्हयालाल मेहता हे १८ देशांची सफर करून नुकतेच मुंबईला परत आले. इतक्या देशांचें पर्यटन करण्यास त्यांना अवघा ८,००० रुपये खर्च आला. त्यांनीं प्रवासांत येणारा सर्व खर्च केला, मार्गानें जाणाऱ्या–येणाऱ्या वाहनांकडून त्यांनीं वाटचालीसाठीं मदत घेतली नाहीं अगर खर्चासाठीं काम करून पैसेहि मिळविले नाहींत.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना : १९३५



भांडवल

**वसूल भांडवल व गंगाजळी रु. २३,७५,०००**

**खेळतें भांडवल रु. ४॥ कोटींवर**

★ बँका या देशाच्या अर्थव्यवस्थेंत जनता व सरकार यांच्यामधील दुवा आहेत. लोकांच्या लहान लहान ठेवी एकत्र करून त्यांतून सरकारी कर्जरोखे विकत घेऊन सरकारला राष्ट्रीय योजनांसाठीं लागणारा पैसा बँका पुरवितात. आपणही आपलें खातें दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. मध्यें उघडून राष्ट्राचे आर्थिक विकासास हातभार लावा.

**खालील ठिकाणीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची व्यवस्था असून लॉकर्स उपलब्ध आहेत.**

**मुख्य कचेरी व डेक्कन जिमखाना, शाखा सोलापूर, नाशिक, अहमदनगर व श्रीरामपूर.**

★ व्यवस्थापत्रें, विश्वस्तपत्रें वगैरेंचे व्यवस्थेसाठीं महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी कं. लि. कडे चौकशी करावी.

मुख्य कचेरी:— थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

**चिं. वि. जोग,**
मॅनेजर.



WILICO

## नोकर विमा योजना

शिक्षणसंस्था, सरकारी कचेऱ्या, नगरपालिका, कारखाने वगैरे सार्वजनिक किंवा व्यापारी संस्थांमधून काम करणाऱ्यांना अत्यल्प हप्त्यामध्यें जास्तींत जास्त व उत्कृष्ट विम्याचें संरक्षण घेतां यावें म्हणून वेस्टर्ननें

## स्टाफ इन्शुअरन्स स्कीम

नांवाची एक अभिनव योजना तयार केली आहे. सदर योजनेप्रमाणें विम्याचे हप्ते नेहमींपेक्षा १२ ते १५ टक्क्यांनीं कमी पडतात. हप्ते पगारांतून परस्पर भरतां येण्याची व्यवस्था करतां येते.

अधिक माहिती शाखाधिकारी आनंदानें देतील आजच लिहा अगर भेटा.

—फोन नं. ३४०१—

# वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

पुणें शाखा:— वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.

## लॉइड्स बँकेचा अनुभव : पुरुष नोकरांचें प्रमाण घटत चाललें

लॉइड्स बँक लि. चे चेअरमन, दि राइट ऑनरेबल सर ऑलिव्हर फ्रँक्स ह्यांनी बँकेच्या भागीदारांकडे वार्षिक ताळेबंदा-सोबत आपलें निवेदन पाठविलें आहे, त्यांत त्यांनी बँकेच्या कारभाराचा विस्तृत आढावा घेतला आहे. युद्धापूर्वीची लॉइड्स बँक व आतांची लॉइड्स बँक ह्यांतील फरक त्यांनी स्पष्ट करून दाखविला असून प्रचलित प्रश्नांचीहि चर्चा केली आहे. १९३८ ते १९५४ ह्या मुदतींत युद्धकाळांतील व युद्धोत्तरकाळांतील तुटीच्या अर्थव्यवस्थेमुळें चलनाची क्रयशक्ति उतरली; हा उतार अद्याप आटोक्यांत पूर्णपणें आलेला नाहीं. क्लिअरिंग बँकांकडील ठेवी ह्या काळांत तिपटीनें वाढल्या आहेत. सरकारी धोरणाचाच तो अप्रत्यक्ष परिणाम आहे.

बँकर्स ह्या नात्यानें आमचें पहिलें कर्तव्य म्हणजे, बँकेच्या १,७५० कचेऱ्यांत पुरेशी रोकड रक्कम सतत उपलब्ध ठेवून खातेदारांची सोय करणें हें होय. रोकडीचा पुरवठा पुरेसा असला पाहिजे, इतकेंच नव्हे, तर वेगवेगळ्या किंमतीच्या नोटा व नाणीं ह्यांत तो योग्य प्रकारें वाटला गेला पाहिजे. ही गोष्ट आपोआप घडून येत नाहीं; अचूक अंदाज बांधून त्याप्रमाणें व्यवस्था करण्याची दक्षता बाळगावी लागते. आपली बँक व इतर बँका यांचेमधील प्रत्यक्ष रोकडीची ने-आण सोडली, तरी आपल्याच वेगवेगळ्या कचेऱ्यांतून ५० कोटि पौंड रोकडेची ने-आण बँकेस करावी लागली. चांदीच्या स्वरूपांत, दरसाल १० कोटि पौंडांची ( ११,००० टन ) कौंटरवर देवघेव होते. चेक्स व हिशेबी नोंदी ह्यांचे द्वारा पैशाची देवघेव होते, ती वेगळीच. १९३८ च्या मानानें आतां ठेवी तिप्पट झाल्या आहेत. चालू खात्यावर दरसाल ३५०० कोटि पौंडांचे चेक काढले जातात. सध्यां बँकेकडे सर्व प्रकारची मिळून २५ लक्ष खातीं आहेत व त्यांपैकी दोन तृतीयांश करंट अकाउंटचीं आहेत.

बँकेचे व्यवहार प्रचंड प्रमाणांत वाढले असले, तरी युद्धापूर्वी जेवढे पुरुष-नोकर बँकेंत कामावर होते, तेवढेसुद्धां आज नाहींत. १९३८ मध्यें, बँकेच्या आपल्या प्रत्येक पांच नोकरांपैकी चार पुरुष होते व एक स्त्री होती. आतां पुरुष-नोकर व स्त्री-नोकर ह्यांची संख्या जवळ जवळ सारखीच झाली आहे. बहुतेक स्त्री-नोकर विवाह जमेपर्यंतच नोकरी करतात, त्यामुळें त्यांचें लक्ष बढती मिळविण्याकडे व वरच्या अधिकाराच्या जागांना पोंचण्याकडे नसतेंच मुळीं सहाजिकच, ज्या जागेवरच्या अधिकाऱ्यांवर तारतम्य पाहून निर्णय घेण्याची जबाबदारी असते, अशा जागा जरा दीर्घकाळ उमेदवारी करणाऱ्या पुरुष-नोकरांच्या वांट्यासच जातात. ह्या कारणानें, पुरुषांना ह्या जागा मिळविण्यासाठीं आतां फार वाट पहावी लागत नाहीं; पूर्वीच्या मानानें आतां तरुण वयांतच जबाबदारीच्या जागा त्यांना मिळूं शकतात. बँकांतील दैनंदिन कामाच्या यांत्रिकीकरणामुळें नोकरांची एकूण संख्या कामाचे प्रमाणांत वाढत नाहीं; लॉइड्स बँकेच्या ५०० शाखांचें यांत्रिकीकरण पूर्ण झालेलें आहे; नव्या नव्या यंत्रांची वरचेवर भर पडत आहे.

### नोटांना लागणारा कागद तयार करणारी गिरणी

चलनी नोटांना लागणारा कागद भारतांतच तयार करणें जरूर झालें आहे. त्यासाठीं २½ कोटी रु. ची गिरणी मध्यवर्ती सरकार काढणार आहे.





स्थापना १९३६
**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**
[ शेड्यूल्ड बँक ]
हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद
ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७१,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

**अन्नाचें रहस्य**




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

## राष्ट्रीय अर्थकारणांत हातमाग धंद्याचें स्थान

आपल्या देशांतील घरगुती उद्योगधंद्यांपैकीं हातमागाचा धंदा सर्वांत मोठा आहे. अतिशय पुरातन कालापासून भारतांत अत्युत्कृष्ट दर्जाचें कापड तयार होत आहे. १८ व्या शतकापर्यंत भारतीय कापडाची मध्यपूर्वेतील, तसेंच युरोपांतील देशांत मोठ्या प्रमाणावर निर्यात होत असे.

भारत सरकारनें नेमलेल्या कापड चौकशी समितीनें आपल्या राष्ट्रीय अर्थकारणांत हातमागास असलेल्या स्थानाबद्दल अतिशय उपयुक्त अशी माहिती उजेडांत आणली आहे. या समितीच्या निष्कर्षानुसार, देशांत आज १२ लाख हातमाग काम करीत असून त्यामुळें विणकरांस वर्षांतील कमींत कमी २०० दिवस काम मिळतें. सरासरी पाहतां, एका हातमागामुळें जवळजवळ १·२५ कामगारांस संपूर्ण वेळ काम मिळतें; म्हणजेच हातमाग धंद्यामुळें सध्यां देशांतील १५ लाख कामगारांस २०० संपूर्ण दिवस काम मिळतें. ओरिसा आणि प. बंगाल राज्यांतील एखाद-दुसरें ठिकाण वगळल्यास हातमाग विणकरास बहुधा संपूर्ण दिवस काम मिळतें. त्याकडे सर्वसाधारणतः शेतजमीन अगर निर्वाहाचें इतर साधन नसतें. १९५४ मध्यें देशांत १९४ कोटी वार हातमागी कापडाचें उत्पादन झालें.

संघटित अशा गिरणीकापडधंद्याशीं तुलना करतां, हातमाग धंद्याची कामगारांस काम देण्याची संभाव्य शक्ति कितीतरी जास्त आहे. उपरोक्त समितीच्या निष्कर्षानुसार, हातमागी कापडापेक्षां ३॥ पटीनें अधिक गिरणी-कापडाच्या उत्पादनासाठीं हातमाग धंद्यांत काम मिळणाऱ्या कामगारांच्या केवळ १/६ कामगारांची जरूरी आहे.

हातमागाऐवजीं निमस्वयंचलित अगर विजेवर चालणाऱ्या मागांचा वापर करून या धंद्यांत तांत्रिक दृष्ट्या अधिक कार्यक्षमता आणणाऱ्या एका योजनेची समितीनें शिफारस केली आहे. हें परिवर्तन ६ वर्षांत व्हावें. या काळावधींत ३६ लाख हातमागांचे ६०,००० वीज माग व १·५ लाख स्वयंचलित मागांत रूपांतर होईल. बाकीच्या ९ लाख हातमागांचेंहि अशाच रीतीनें २ वा ३ पंचवार्षिक टप्प्यांत रूपांतर व्हावें. म्हणजे १५/२० वर्षांअखेर केवळ ५० हजार हातमाग सोडून बाकीच्या मागांचें वरील प्रकारांत रूपांतर होईल. अतिशय गुंतागुंतीचें नक्षीकाम असलेलें उत्कृष्ट दर्जाचें कापड तयार करण्यासाठीं या ५० हजार हातमागांचा उपयोग केला जाईल. त्यानंतर या धंद्याचें विकेंद्रीकरण करण्यांत येईल. समितीनें केलेल्या शिफारशींवर भारत सरकार विचार करीत आहे.

१९५२ मध्यें हातमागधंद्यावर एक महान् अरिष्ट कोसळलें होतें, हातमागी कापडाचे सांठे वाढले होते आणि मागणींत घट झाल्यानें उत्पादनहि घटलें आणि परिणामीं अनेक विणकरांवर बेकारीची पाळी आली. परंतु या विणकरांस साहय करण्यासाठीं भारत सरकारनें अनेक उपाय योजून हा धंदा भक्कम पायावर उभा केला आणि आज विणकरांची परिस्थिति बरीच सुधारल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. आज विणकरांचें उत्पन्न वाढलें आहे. तसेंच चालू मागांची संख्या वाढत आहे. हातमागी कापडाची विक्री अधिक होत असून अशा कापडाचे सांठे तयार होणें ही एक भूतकाळांत जमा झालेली बाब आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब ग. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर ( डो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.